# परिशिष्ट क्रमांक ४

**अडत्या - व्यापारीची अनुज्ञप्ति मिळणेकरिता अर्ज केलेल्या इसमाने करुन देण्याचा करारनाम्याचा नमुना**

**(उपविधी ५(२) पहा)**

**मा. सभापती,**

**मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई यांसी,**

करारनामा करुन देणार मी - आम्ही

नाव ______________________ वय ________

व्यवसायाचा पत्ता ______________________

राहणार ______________________

**आपल्याशी आज रोजी करारनामा करून देतो की,**

१) महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियम) अधिनियम, १९६३, त्याखालील नियम, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबईचे उपविधी व त्याखालील उपनियम मी - आम्ही संपूर्णपणे वाचले असून ते मला - आम्हास पूर्णपणे समजले आहेत व त्याप्रमाणे व त्यात पुढे वेळोवेळी होणा-या दुरुस्त्याप्रमाणे तसेच बाजार समितीचे झालेले व पुढे होणारे ठराव, हुकुम याप्रमाणे मी - आम्ही वागण्याचे कबूल करतो.

२) वरील अधिनियम, नियम, उपविधी व त्याखालील उपनियम तसेच बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशी सर्व प्रपत्रे, नोंदवह्या मी आम्ही आवश्यक ती माहिती अद्यावत लिहून ठेवीन - ठेवू. तसेच बाजार समितीस हवी असलेली माहिती वेळोवेळी फर्माविण्यात येईल. अशा नमुन्यात पुरवीन - पुरवू व ही कागदपत्रे योग्य ते अधिकार दिलेल्या अधिका-यास तपासणीसाठी उपलब्ध करुन देईन. देऊ व तपासणी कामी मदत करीन - करू.

३) वरील अधिनियम, नियम व उपविधी व त्याखालील उपनियमान्वये द्यावयाच्या सर्व रकमा मी/आम्ही बाजार समितीकडे वेळचेवेळी संपूर्णपणे भरणा करीन - करू.

४) मी - आम्ही व माझे आमचे वतीने अन्य व इसमांनी केलेल्या सर्व कृत्याबद्दल संपूर्णपणे जबाबदार राहीन - राहू.

५) बाजार समिती देणे असलेल्या फी व अन्य रकमा देण्यात चुकवाचुकव करणा-यांशी तसेच अनधिकृत इसमांशी मी - आम्ही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करणार नाही. व अशा इसमांविरुद्ध कायदेशीर उपाययोजना करण्यास बाजार समितीस सहकार्य करीन - करु.

६) बाजार समितीशी मी - आम्ही नेहमी सहकार्याचे धोरण ठेवीन - ठेवू. बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशा रितीने आमचे कामकाज करीन - करु. बाजारातील कोणत्याही कामकाजात अडथळा येईल अगर चालू कामकाज बंद पडेल असे वर्तन करणार नाही. तसेच मी - आम्ही व्यवसाय करीत असलेल्या बाजाराची प्रतिष्ठा व लौकिक अधिकाधिक वाढेल अशा पद्धतीने मी - आम्ही कामकाज करीन - करु.

आमचे समक्ष सही केली -

सही

(१) सही ______________________

नाव ______________________

पत्ता ______________________

दिनांक

(२) सही ______________________

नाव ______________________

पत्ता ______________________